**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ११३/२०१४</u>**

**<u>निशाणी क्रमांक ५४ खालील आदेश</u>**

(पांडुरंग धनाजी चव्हाण वि. रेखा पांडुरंग पवार वगैरे १६)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी क्र.१५ ते १७ यांनी सदर दाव्यास दि.२७.०२.२०१७ रोजी कैफियत देवून कैफियत कलम १० मधील वादी यांनी वडिलार्जित सि.स.नं.६७७ व सि.स.नं.६७९ या मिळकती दाव्यात समाविष्ट केल्या नाहीत अशी कैफियत दिली आहे. त्यामुळे दावा कलम १ब च्या शेवटी घर मिळकती दाव्याच्या कामी समाविष्ट करणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यामुळे वादी यांना दावा दुरुस्त करणेची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१५ ते १७ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे अर्जाच्या पाठीमागील बाजुस दिलेली आहे व प्रस्तुतची दुरुस्ती करण्यास त्यांची काहीच हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

३. प्रस्तुत दाव्यातील तांत्रिक टायपिंग चुकीमुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा दुरुस्त करणे भाग पडत आहे. प्रस्तुतची दावा दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाल होण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. दावा दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास काहीही नुकसान होणार नाही. सबब, मी वरील सर्व विवेचनावरुन असा निष्कर्ष काढते की, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>– आदेश –</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
२. वादी यांनी दुरुस्ती अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये कायद्यानुसार देय मुदतीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे व दावा दुरुस्ती प्रत दाखल करावयाची आहे.

सही/–

**<u>तासगांव.</u>** (सौ.टी.एस. महाडिक)

दिनांक ११.०४.२०१८ २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर **<u>तासगांव.</u>**